॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव २८ (        ) शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०७ नुसार नवीन महाविद्यालये व विस्तारांच्या प्रस्तावाबाबत विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता नवीन महाविद्यालये व विस्ताराचे प्रस्ताव १ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षासाठी नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, विद्याशाखा व अतिरिक्त तुकडी या संदर्भात यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या बृहत विकास आराखडा भाग-२ नुसारचे प्रस्ताव दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येणार होते तथापी दि. २८ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या निर्णयानुसार बृहत आराखडा भाग २ मध्ये नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, विद्याशाखा व अतिरिक्त तुकडी यांचा समावेश नाही त्यांचेही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार आहेत. ३० सप्टेंबर, २०१८ रोजी रविवार असल्याकारणाने १ ऑक्टोबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील मात्र यासाठी लागणारा शुल्काचा धनादेश/ धनाकर्ष हा दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ पुर्वीचा असणे आवश्यक आहे. तेव्हा इच्छुक महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव तातडीने सादर करावेत, याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी कळविले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 28 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
जनसंपर्क अधिकारी यांचे करीता

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in